# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

**दिनांक १५.१०.२०२६ गुरूवार**

**गुन्हेगारांचा आदान—प्रदान कार्यक्रम संपन्न :—**

मा. पोलीस आयुक्त श्री. विश्वास नांगरे पाटील यांचे संकल्पनेतुन व मार्गदर्शनाने नागपूर पोलीस आयुक्तालय अंतर्गत विविध पोलीस ठाणे हद्दीतील रेकॉर्डवरील एकूण ६३ अटक आरोपींचे आदान—प्रदान हे दिनांक १५.१०.२०२६ चे १०.०० वा. मा. अपर पोलीस आयुक्त कार्यालय (दक्षिण प्रभाग), नागपुर शहर येथे पार पडले. आदान—प्रदान कार्यक्रमाचा मुळ उद्येश हा पोलीस अधिकारी व अंमलदार यांना आरोपींची ओळख पटावी, आरोपींची गुन्हे पध्दती समजण्यास मदत व्हावी तसेच, त्याचेवर कोणकोणते, किती व कुठे गुन्हे दाखल आहेत, याबाबत माहितीचे आदान—प्रदान सुलभरितीने करता यावे असा होता. कार्यक्रम प्रसंगी मा. श्री. वसंत परदेशी (दक्षिण प्रभाग), मा. पोलीस उप आयुक्त श्री. ऋषिकेश रेड्डी (परि. क्र. ०१), मा. श्री. नित्यानंद झा (परि. क्र. ०५), मा. सहायक पोलीस आयुक्त श्री. नरेंद्र हिवरे (अजनी विभाग), मा. श्री. शिवाजी गायकवाड (सोनेगाव विभाग) व मा. श्री. रोहीत ओव्हाळ (कळमना व पारडी विभाग) हे उपस्थित होते. तसेच, एकूण १५ पोलीस ठाणे येथील आरोपींना अटक करणारे व हजर आणणारे संबंधीत पोलीस ठाणेंचे ठाणेदार, तपास पथक व एमओबी पथकातील असे एकुण १५ अधिकारी व ३२ अंमलदार हजर होते. दिनांक १४.०७.२०२६ पासुन आजपावेतो एकूण ८४९ अटक आरोपीतांना आदान—प्रदान मोहीमेकरीता हजर करण्यात आलेले आहे.

कार्यक्रम प्रसंगी मा. अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) यांनी सीसीसी द्वारे चालणारी कार्यपध्दती त्याचप्रमाणे सिम्बा ॲप प्रणाली समजून घेवुन, हजर आरोपींची इत्यंभुत माहिती सिंबा प्रणालीमध्ये वेळीच अद्ययावत करण्याबाबत, त्याचप्रमाणे आरोपींचा डोजीअर फार्म, फिंगरप्रिंटस्, मोडस ऑपरेंडी याबाबत माहिती प्राप्त करुन संकलित करावी. अटक आरोपीतांवर योग्य त्या प्रतिबंधक कार्यवाही कराव्यात अशा हजर ठाणे प्रभारी व तपासी अधिकारी व अंमलदार यांना सुचना दिल्या.



**(कामगिरी)**

**१) गुन्हेशाखा युनिट ०४ पोलीसांची कामगीरी :— जेसीबी चोरी करणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०९.१०.२०२६ चे २१.३० वा. ते दि. १०.१०.२०२६ चे ०९.०० वा. चे दरम्यान, फिर्यादी वैभव केशवराव घोरमाडे, वय ४५ वर्षे, रा. प्लॉट नं. २१, एकता नगर, गोरेवाडा रोड, गिट्टीखदान, नागपूर यांनी त्यांचे इंडीया लिमीटेड कंपनीची ३ डीएक्स जेसीबी मशीन क्र. एमएच ३१ जीए ६७३२ किंमती अंदाजे १८,००,०००/—रू., ही पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीत प्लॉट क्र.०१, संस्कृती सोसायटी, जगन्नाथनगर येथे लॉक करून, पार्क करून ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची जेसीबी मशीन चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासात गुन्हेशाखा युनिट क्र. ०४ चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रीक तपास करून व खात्रीशीर माहीतीवरून नमुद जेसीबी वाहन व आरोपी हे कटंगी, जि. बालाघाट, मध्य प्रदेश येथे असल्याचे निष्पन्न केले. यावरून कटंगी, बालाघाट येथे जावून व स्थानिक पोलीसांच्या मदतीने आरोपी क्र. १) रेहान खान सुलतान खान, वय ३० वर्षे, रा. वार्ड नं. ०९, जुना पेट्रोलपंप चौक, कटंगी, जि. बालाघाट, मध्य प्रदेश २) आशिष हंसराज सहारे, वय २५ वर्षे, रा रामपूरी, पोस्ट सिहोरा, थाना लालबर्रा, जि. बालाघाट, मध्य प्रदेश ३) सचिन चंद्रशेखर गौतम, वय २१ वर्षे, रा. चांदटोला, थाना लामता, जि. बालाघाट, मध्य प्रदेश ४) अफरोज खान वाहिद खान, वय ४० वर्षे, लालबर्रा, जि. बालाघाट, मध्य प्रदेश ५) देवेन्द्रकुमार उषाराम सहारे, वय ४० वर्षे, रा. बोरी मोहगाव, थाना लालबर्रा, जि. बालाघाट, मध्य प्रदेश यांना ताब्यात घेतले. आरोपींना गुन्हेसंबंधाने विचारपुस केली असता, त्यांनी वर नमुद जेसीबी चोरीचा गुन्हा संगणमताने केल्याची कबुली दिली. आरोपींचे ताब्यातुन इंडीया लिमीटेड कंपनीची ३ डीएक्स जेसीबी मशीन व ०५ मोबाईल फोन किंमती १८,५०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपींना मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव बेलतरोडी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), मा. दिपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, मपोनि. संजीवनी थोरात, सपोनि. वैभव बारंगे, पोउपनि. जितेशाचारी आरवेल्ली, पोहवा भगवतीकुमार ठाकुर, पुरूषोत्तम जगनाडे, अभिषेक शनिवारे, पोअं. गोविंद देशमुख, व महेश काटवले यांनी केली.



**२) नविन कामठी पोलीसांची कामगीरी :— वाहन चोरी करणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक १०.१०.२०२६ चे २३.०० वा. ते दि. ११.१०.२०२६ चे ०८.०० वा. चे दरम्यान, फिर्यादी रोहीत कांचन जैस्वाल, वय ३० वर्षे, रा. रविदास नगर, डॉक्टर चौधरी यांचे घराजवळ, कामठी, नागपूर यांनी

त्यांची बजाज पल्सर दुचाकी क्र. यु.पी ६३ बी.डी ५१२८ किंमती अंदाजे ९०,०००/—रू., ही पोलीस ठाणे नविन कामठी हद्दीतील आपले राहेते घरासमोर लॉक करून, पार्क करून ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची दुचाकी चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नविन कामठी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासात नविन कामठी पोलीसांनी तांत्रीक तपास करून व मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून एका विधीसंघर्षग्रस्त बालकास ताब्यात घेतले. त्यास गुन्हेसंबंधाने विचारपुस केली असता, त्याने वर नमुद वाहन चोरीचा गुन्हा त्याचा साथीदार पाहिजे आरोपी नामे मन अशोक चवरे, वय २१ वर्षे, रा. अमर नगर, एमआयडीसी, नागपूर याचेसह संगणमताने केल्याची कबुली दिली. विधीसंघर्षग्रस्त बालकाचे ताब्यातुन बजाज पल्सर दुचाकी क्र. यु.पी ६३ बी.डी ५१२८ किंमती ९०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पाहीजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रमेश धुमाळ, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ६), मा. श्री. अंकुश खेडकर, सहा. पोलीस आयुक्त (कामठी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. महेश आंधळे, पोउपनि. अक्षय झगडे, पोहवा. दिपक चोले, पोअं. नसीम अंसारी, नितेश नवघडे, आकाश टेकाम व विलास चिंचुलकर यांनी केली.



**<u>३) गुन्हेशाखा वाहन चोरी विरोधी पथक पोलीसांची कामगीरी :— फरार पाहिजे आरोपींना अटक.</u>**

**अ)** दिनांक १५.१०.२०२६ चे १०.०० वा. चे सुमारास, गुन्हेशाखा वाहन चोरी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार पेट्रोलिंग करीत असता, पथकातील पोहवा. रोशन तिवारी व विलास कोकाटे यांना त्यांचे विश्वसनिय बातमीदारमार्फतीने खात्रीशीर माहिति मिळाली की, पोलीस ठाणे वाडी येथे दाखल गुन्ह्यातील फरार असलेला पाहिजे आरोपी भोला सोनावणे हा वाडी परिसरात आला आहे. अशा माहितीवरून आरोपीचा परिसरात शोध घेतला असता, कंट्रोल वाडी परिसरात प्राप्त वर्णनाचा एक इसम संशयीतरित्या दिसून आला. पंचासमक्ष त्यास ताब्यात घेवून, त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव भोला मधूकर सोनवणे, वय ५७ वर्षे, रा. आंबेडकर नगर, वाडी, नागपूर असे सांगितले. त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, पोलीस ठाणे वाडी येथे दाखल अप. क्र. २०७०/२००८ कलम ३४१ भा.दं.वि. अन्वये गुन्ह्यात तो पाहिजे असल्याचे दिसून आले. आरोपीस गुन्हे संबंधाने विचारपूस केली असता, त्याने गुन्ह्याची कबुली दिली. गुन्ह्यातील आरोपी हा गुन्हा घडल्यापासून स्वत:चे अस्तीत्व लपवुन, मिळुन न आल्याने व मा. न्यायालयासमक्ष हजर न आल्याने त्यास मा. न्यायालयाने फरार घोषीत केलेले असुन, तो मागील १८ वर्षापासून फरार होता. त्यास गुन्हेसंबंधाने अटक करण्यात

आली आहे. आरोपीस पुढील कार्यवाहीस्तव वाडी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

**ब)** दिनांक १५.१०.२०२६ चे १६.०० वा. चे सुमारास, गुन्हेशाखा वाहन चोरी विरोधी पथकाचे पोहवा. रोशन तिवारी व विलास कोकाटे पोलीस ठाणे वाडी हद्दीत पेट्रोलिंग करीत असता, त्यांना त्यांचे विश्वसनिय बातमीदारमार्फतीने खात्रीशीर माहिती मिळाली की, पोलीस ठाणे वाडी येथे दाखल एका गुन्ह्यातील फरार असलेला पाहिजे आरोपी प्रविण बारंगे हा बाजारगांव परिसरात आहे. अशा माहितीवरून आरोपीचा बाजारगांव परिसरात शोध घेतला असता, प्राप्त वर्णनाचा एक इसम दिसून आला. तो पोलीसांना पाहुन पळुन जात असता, त्याचा पाठलाग करून त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव प्रविण रामचंद्र बारंगे, वय ४० वर्षे, रा. वेणा नगर, वाडी, नागपूर असे सांगितले. त्यास पोलीस ठाणे येथे आणुन त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, तो पोलीस ठाणे वाडी येथे दाखल अप. क्र. ३४०/२०१५ कलम २७९ भा.दं. वि. अन्वये गुन्ह्यात तो पाहिजे असल्याचे दिसून आले. आरोपीस गुन्हे संबंधाने विचारपूस केली असता, त्याने गुन्ह्याची कबुली दिली. गुन्ह्यातील आरोपी हा गुन्हा घडल्यापासून स्वतःचे अस्तीत्व लपवुन, मिळुन न आल्याने व मा. न्यायालयासमक्ष हजर न आल्याने त्यास मा. न्यायालयाने फरार घोषीत केले होते. त्यास गुन्हेसंबंधाने अटक करण्यात आली आहे. आरोपीस पुढील कार्यवाहीस्तव वाडी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), मा. दिपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे शाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. पप्पू कादरी, पोहवा रोशन तिवारी, विलास कोकाटे व राहुल कुसरामे यांनी केली.



**अ)**



**ब)**

**(गुन्हे)**

**<u>पोलीस ठाणे शांतीनगर :– फसवणुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

फिर्यादी अब्दुल्लाह मोहम्मद आरीफ राईन, वय २६ वर्षे, रा. प्लॉट क्र. १६ ए, रामसुमेरबाबा नगर, कावरापेठ, शांतीनगर, नागपूर यांना दुचाकी विकत घेणे असल्याने, त्यांनी पोलीस ठाणे शांतीनगर हद्दीतील महाराष्ट्र मोटर्स मल्टीब्राण्ड टु–व्हिलर शोरूम येथे संपर्क साधला. तेथे शोरूम मालक आरोपी नामे तौफीक अशरफी, वय ३५ वर्षे, रा. प्लॉट नं. ५७/५८, कवठा रोड, शकुरनगर, चिश्तीया लॉन समोर, नाका नं. ०२,

कामठी रोड, नागपूर याने दुचाकी करीता ५० टक्के डाऊन पेमेन्ट केल्यानंतर उर्वरीत रक्कम १४ मासीक किस्तमध्ये भरण्याची स्कीम फिर्यादीस सांगून त्यांचा विश्वास संपादन केला. दिनांक २८.०९.२०२४ चे १०.०० वा. ते दि. २८.०४.२०२५ चे २०.०० वा. दरम्यान, आरोपीने फिर्यादी व इतर ०७ लोकांकडून दुचाकीची डाऊन पेमेन्ट म्हणून ५० टक्के रक्कम एकुण ४,८९,७६६/—रू. घेवून, त्यातील छोटी रक्कम फायनांस कंपनीला वास्तविक डाऊन पेमेन्ट म्हणून जमा केली व उर्वरीत रक्कम जाणीवपुर्वक स्वत:चे निजी खर्चाकरीता उपयोगात आणली. आरोपीने फिर्यादी व ईतर ०७ जणांना जाणीवपुर्वक खोटी स्कीम खरी असल्याचे भासवुन, त्या सर्वांना १४ मासीक किस्तऐवजी ३८ मासिक किस्त व त्यावरील व्याज फायनांस कंपनीला भरायचे असल्याने, आरोपीने फिर्यादी व इतर ०७ लोकांचा अन्यायाने विश्वासघात करुन त्यांची आर्थिक फसवणूक केली.

यापकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे शांतीनगर येथे सफौ. प्रमोद बुरबुरे ९४२२३३१९०० यांनी आरोपीविरूध्द कलम ३१६(२),३१८(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे कोराडी</u> :—** दिनांक १५.१०.२०२६ चे ११.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे कोराडी हद्दीत, कवठा गावालगत असलेल्या राखड तलावजवळील एका पडीत झोपडीमध्ये एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ४० ते ४५ वर्षे वयाचे इसम बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे कोराडी येथे संपर्क साधावा.

यापकरणी फिर्यादी सरतर्फे पोहवा. लिलाधर गोहणे यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे कोराडी येथे अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**